
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277-5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL



Volume-VIII, Issue-IV
October - December - 2019
Part - IV

# AJANTA

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.co

Ajanta Prakashan

# २. वैदर्भीय लोकगीत एक आढावा

**डॉ. कविता राजाभोज**
मराठी विभागप्रमुख, एस. एस. गर्ल्स कॉलेज, गोंदिया.

वेद, श्रुती शास्त्रीय ग्रंथ पुराणे यांचा भरपूर साठा असलेल्या आपल्या भरतभूमीत प्रांतवार साहित्याचीही कमतरता नाही. येथील बहूसंख्य प्रजा शतकानुशतके निरक्षर अज्ञानी राहूनही भाशेच्या माध्यमातून व्यक्त होत गेली आणि जीवनानुभवाची भरपूर शिदोरी लोकसाहित्याच्या माध्यमातून निर्माण झाली. महाराष्ट्रात प्रत्येक भागातील म्हणजे खानदेश, मराठवाडा, व—हाड या प्रांतातील त्यांच्या भाषेतून व्यक्त झालेले अनुभव प्राथमिक स्वरुपात लोकगीताच्या रुपाने अवतरले, जीवनानुभव व्यक्त करण्याच्या हा प्रकार सहज आणि सोपा असल्यामुळे लोकगीतांची संख्या भरपूर आहे. मराठीतील व—हाडी लोकगीते म्हणजे व—हाडी बोलीचा खाजिनाच होय. व—हाडातील ग्रामीण लोकांचे जीवन, संस्कृती रीतिरिवाज राहणीमान यांचे प्रत्यक्ष चित्रण व—हाडी लोकगीतामध्ये आढळते या गीतांमध्ये **वैदर्भी बोली** आणी **वैदर्भी रीती** यांना महत्वाचे स्थान आहे. विदर्भाच्या सुपीक शेतीत अन्नासोबत वस्त्र या दुस—या मलूभूत गरजाची पूर्ती करण्याचे समार्थ असून त्याचेही महत्व व—हाडी लोकगीतात आहे. भारतात तिस—या शतकापासून लोकगीत प्रचलित असल्याचा पूरावा मिळतो. हा पूरावा **गाथा सप्तशती** वरुन मिळतोच पण अपभ्रंश काळात **संदेशरासक** या ग्रंथातूनही मिळतो अशी लोकगीते महानुभावीय वाङमयातही स्त्रीगीते म्हणून **गुढे व धवळे** यांचा उल्लेख मिळतो. ही लोकगीते मौखिक व पारंपारिक असतात. व—हाडातील लोकगीतांची मांडणी अनेक अभ्यासकांनी केलेली आहे. यापैकी वैदर्भीय लोकगींताना भाषेच्या आणि समाजजीवनाच्या अनुभवाने वेगळे रुप आलेले आहे. व—हाड प्रांत म्हटला की ग्रामीण चित्र डोळ्यांसमोर येते आणि लोकगीते ही ग्रामजीवनाशीच संबंधित असून ग्राम जीवनाचे विविधांगी चित्रण या गीतांमध्ये पाहायला मिळते. शेती हा मुख्य व्यवसाय असून शेतीवर मजूरी करणे हा दुसरा उपजिवीकेचा मार्ग ग्रामीण भागात असतो. गरजे नुसार थोडेफार पूरक असे व्यवसायही चालतात. परंपरागत व्यवसाय करणाराही एक विशिष्ट समूह असतो धर्म, देव, जात, सामाजिक भदोभेद, चालीरीती, परंपरा, कुळ अशा विभिन्न रुढ बाबीवर ग्रामीण समाजजीवन चालत असते. राज्यव्यवस्था, राजा, गावप्रमुख, गावकारभारी, गुरुजी यांचे ग्रामीण जीवनात मोठे स्थान असते. या सर्वांचे वर्णन लोकगीतात अत्यंत जिंवत व प्रत्यक्ष असल्यामुळे व—हाडी लोकगीत हा प्रकार जीवनाच्या आरसा आहे असे म्हणता येते.

व—हाडी बोलीतील लोकगीतातून ग्रामीण जीवनाच्या दर्शनाबरोबरच कौटुंबिक जीवनाचे दर्शनही घडते. लोकांचा भोळा—भावडा श्रध्दाळू स्वभाव, गृहीणीची वत्सलता, बहीण भावडांचे प्रेममय नाते, पतीपत्नीतील प्रेमाचे आत्मिक संबंध, आई—वडीलाबद्दल मोलाचा स्नेहभाव, नंनद—भावजयातील आंबट—गोड संबंध, दिर—भावयजातील जिव्हाळा, बहिनी—बहिणीतील माया, माहेरवास—सासुरवास या सर्वांचे चित्रण या गीतातून पाहायला मिळते. गृहीणी प्रभात समयी आपल्या गृहकामात दक्ष झाली की तिच्या ओठावर प्रत्येक कामाकरिता ओव्या, गीत येत असतात.

सकाळच्या पायरी, सडयाची अंगणी शोभा । तुयसी खाल्या राही, सावया राम उभा ।।

सकायच्या पायरी, रई फिरते डे—यात । डोल डोलते गौळण, दोर घेवून हातात ।।

जात्यावरुन दळण दळणे असो की सडा सारवण असो तीला घरकामात आनंद वाटते. तो आनंद ती ओवीच्या माध्यमातून प्रकट करते. बहिण या नात्याने भाऊ कसाही असला तरी तिला प्रिय असतो, त्यातच बहिणीवर, कुटूंबावर माया करणारा असला तर

बंधुराजाचं वावर मोत्यामाणकानं भरलं । पापी इंदराचं मन धन पाहून भुललं ।।

काय वो सांगू बाई, माहया भावाची भलाई. सूप टोपलींन बधुं, गावोगावी वाटते कमाई ।।

असे भावाचे गुणगाण बहिण करते. बहिण सासरी जाताना भाऊही तिला प्रेमाची समज देऊन निरोप देतो.

लाज राख भावाची नाक ठेव माहेरचं। जाऊ हे गेला प—यान, सत राख अबरुचं।। सासरी गेलेली मुलगी अथवा बहिण परत कधीच कायमची माहेरी येऊ नये हेच प्रत्येकांचे मत असते म्हणून प्राण गेले तरी चालेल पण कुळाचं, माहेरचं स्वतःच्या शीलाचं नाक खाली येता कामा नये. भाऊ बहिणीचे असे नाते तर बहिणी—बहिणीचे विशेष हितगुज असते. आपली प्रत्येक समस्या अथवा आनंद सांगयला बहिण जवळ असती तर किती छान झाले असते असे विचार येताच डोळयात अश्रू येतात.

गुज बोलायले, दार माळीच ढकलांव । माहे तू बईनाबाई, मंग दुरुंद उकलावं ।।

दिव्याले भरायान घाल दिव्याले जोळ वाती । वडिल बईनी, गुज बोलू सा—या राती ।।

ही भावडांची माया तर आई—लेक संबंधच वेगळे. मुलीच्या सुखाकरीता आई नाही ते प्रयत्न करते, कितीतरी त्रास सहन करते, तिचे दुःख पाहून दुःखी कष्टी होते.

पुरी नजर बोहारी, कोन्या पापिनीची बाई । तानी कोमावली माही, मिठाची वो झाली लाही ।।

तर

मायेच्या उपकार, काय फडेशी येडया जीवा ।मांडीच्या चवरंग, नेतरांचा केला दिवा ।।

अशी आईची वेडी माया तर वडिलांच्या प्रेमाचे वर्णन वेगळेच आहे. बापाला सासरी गेलेल्या मुलीचे वेध जास्त लागतात कारण आपल्यापासून दूर गेलेली लेक सूखी असेल का? हाच प्रश्न सतत भेडसावतो.

बाप म्हणे लेकी, सासुरवास बरा । उसाच टेर, चरख्यात झाला चुरा ।।

किंवा

बाप म्हणे कशी बाई पूरी नाशेबाची हीन । सारे डोंगर शोधून, पाने पळसाले तीन ।।

अशा अत्यंत अथपूर्ण लोकगीतांमध्ये सासुरवास —माहेरवास, नंनद—भावजय, देर—भासरे, जावा, जीवाभावाची सखी असलेली शेजारीन या सर्वांवर असलेली व—हाडी बोलीतील लोकगीते अर्थपूर्ण आणि

कल्पतने ओतप्रोत भरलेली आहेत. पण या सर्वात महत्वाचा घटक म्हणजे पती जम्माचा सोबती याबद्दल सामान्य स्त्रियांच्या मनातील भाव अत्यंत कोमलतेने व्यक्त होतात.

राजामध्ये राज करी, कायी गयसरी राजी । कपायी कूकू लाल, चढवते कसे तेज ।।

बाई सर्व लेंन लेली, लेली लसल्या ताईत । कुकू कपायीचा लाल, सा—या लेन्याचा नाईक ।।

सासरच्या परक्या वातावरणातील हा आनंदाचा घटक सर्वतोपरीने अत्यंत जिव्हाळयाचा असून त्याच्या विरहानेही पत्नी झुरत असते. यासोबत पोटचं बाळही अत्यंत प्रिय असून त्याकरीता स्त्रिया किती आटापिटा करतात आणि सर्वतोपरीने जपतात.

धावे दुडादुडा पायी, गयामंधी कंठी गोफ । हाती पायी कडे तोडे, लाडका गुणाचा लेक ।।

याशिवाय या व–हाडी गीतात धार्मिकता, देवदवता, सण–उत्सव यांचे चित्रण आहे. महादेव, गणपती, कान्होबा, अखाडी दिवाळी, नागपंचमी, राखी, पोळा, पितृपक्ष, संक्रांत या सर्वाचे महत्व सांगणारे अनेक लोकगीत व–हाडी भाषेत आहेत.

पहिली अखाळी सर्वे, सन हलकारी। कातून टोपून नागपंचमीची फेरी.... ।।
नागपंचमीचे काढयले नांग । राखी आली मांगोमांग ।।
कचकन लावेयला डोरा । न अचकन आला पोरा ।।
पो–याचे काढयेले चितर । सहज आले तवा पितर ।।
पितराच्या निसतो दाया । आली दिवारीची छाया ।।
दिवारीची पूंजली पनती । नांगदिवारी आली नेमती ।।
नांगदिवारीचे पूंजतो दिये । पुढ तिरसंक्रांत येऊन जाये ।
तिरसंक्रांत पूंजतो सुगळं । पारनं आल दुगुळ ।।
पारण्याच टाकलं नव । मांडोस आली सव ।।
मांडोसची उभारली गुढी । चैइत आला पुढी ।।
चैईताची उभारली काठी । आली आखेजीची दाटी ।।
आखोजीच्या नितसो वाटया । आल्या दोनही भाव्या ।।
दोन्ही भाव्याचा केला रस । मिरगानं मारली धस ।।

अशाप्रकारे व–हाडी लोकगीतामध्ये संपूर्ण ग्रामीण जीवनाचे, जीवनाच्या सर्व अंगोपांगाचे चित्रण स्त्रियांच्याच नव्हे तर पुरुषांच्याही वाणीने व्यक्त झाल्याचे निदर्शनास येते. या गीतांमध्ये सुख–दुःख, जीवन–मरण, मिलन–विरह, हसू–आसू इत्यादींचे स्पष्ट चित्रण असून मराठी संस्कृतीचे, मांगल्य– पवित्र्याचे दर्शन यात आहे. यासोबातच व–हाडी लोकसाहित्यात लोककथागीत, म्हणी उखाणे वाक्प्रचार यामधूनही समाजजीवनाच्या विविध घटकांचे दर्शन होते म्हणून लोकसाहित्य हा त्या त्या संस्कृतीचा खजिनाच असतो असे म्हणता येते.

**संदर्भ ग्रंथ**

१. लता लांजेवार, : व–हाडी बोलीतीत लोकसाहित्य स्वरुप आणि समीक्षा विजय प्रकाशन, नागपूर ११ एप्रिल २००३.

२. शेंडे. ना. रा लोकसाहित्यसंपदा, प्रकाशक प्रा.श्री.काशीकर, विदर्भ साहित्य संघ, नागपूर १९६४.